महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन – मित्र
५ वा मजला, निर्मल भवन, नरीमन पॉईंट, मुंबई – ४०० ००२१
दूरध्वनी क्रमांक .: ०२२ ६९९७९४४०
ई मेल : admin-mitra@mah.gov.in

# सूचना

**विषय: वरिष्ठ सल्लागार – आरोग्य व पोषण** (Senior Consultant – Health & Nutrition) **व वरिष्ठ सल्लागार – माहिती तंत्रज्ञान** (Senior Consultant – IT) **या पदांच्या भरती प्रक्रियेबाबत.**

**संदर्भ:** मित्र संकेतस्थळावर दिनांक ०१/०९/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेली जाहिरात क्र. DGIPR/2026/2027/2571.

सर्व संबंधित उमेदवारांना याद्वारे कळवण्यात येते की वरील संदर्भाधीन जाहिरातींच्या अनुषंगाने सुरू करण्यात आलेली भरती प्रक्रिया प्रशासकीय कारणास्तव, संबंधित पदांची आवश्यकता/मागणी पुनरावलोकनाधीन असल्याने, पुढील सूचना मिळेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे. या कालावधीत उपरोक्त पदांसाठी कोणतीही प्राप्त अर्ज छाननी किंवा निवड प्रक्रिया राबविण्यात येणार नाही. पुनरावलोकनानंतर पदांची आवश्यकता असल्यास भरती प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याबाबतची किंवा रद्द करण्याबाबतची माहिती मित्रच्या mahamitra.org या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येईल.

सर्व अर्जदारांना कळविण्यात येते की जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज सादर केल्याने संबंधित उमेदवारास भरती प्रक्रियेत सहभागी होण्याचा, निवडीचा किंवा नियुक्तीचा कोणताही हक्क अथवा दावा प्राप्त होत नाही. या जाहिरातीतील अटी व शर्तीनुसार भरती प्रक्रियेत बदल करणे, स्थगित किंवा रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन – मित्र कार्यालयाकडे राखीव आहेत.

या जाहिरातीच्या अनुषंगाने यापूर्वी अर्ज सादर केलेल्या किंवा इतर कोणत्याही प्रकारची कागदपत्रे पाठवलेल्या उमेदवारांची गैरसोय झाल्यास, त्याबद्दल कार्यालय दिलगीर आहे.

**महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन – मित्र**